दि.२६/११/२००८ रोजी मुंबई शहरात झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील मृत व्यक्तींच्या वारसांना केंद्रीय अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. आरएलएफ-२०१५/प्र.क्र. २०९/म-३
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १२ जानेवारी, २०१६

वाचा :- १) केंद्र शासनाचे पत्र क्र.११०४४/११/२०११ व्हीटीव्ही, दि.२९ जून, २०१२
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एनएएक्स १२१२/प्र.क्र.५०१/विशा-१ ब, दि. २१ एप्रिल, २०१४
३) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे पत्र क्र. जीईएल-१/टे-४/नैआ/द.ह./ २०१५, दि. २३.७.२०१५
४) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. ६६/२०१४ संदर्भात दि. १४.१०.२०१४ रोजी दिलेले आदेश.
५) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. पुनर्वि-२०१५/२२३५/प्र. क्र. २३१/ ब-१, दि. ३१.१०.२०१५

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने संदर्भाधीन दि.२९ जून,२०१२ च्या पत्रान्वये दहशतवादी हल्ला/ जातीय दंगल / नक्षल हल्ल्यात बळी पडलेल्या मृतकांच्या वारसांना तसेच कायमस्वरुपी अपंगत्व प्राप्त झालेल्या व्यक्तीस प्रत्येकी रु.३ लाख इतकी मदत देण्याचे घोषित केले आहे. सदर रक्कम प्रथम राज्य शासनाकडून अदा करण्यात येऊन त्याची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या अध्यक्षतेखाली दि. १७ जून, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत दि. २६/११/२००८ रोजी मुंबई शहरात झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील मृत व्यक्तींच्या वारसांना मदत देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी केंद्रीय योजनेनुसार मृत व्यक्तीच्या वारसास मदत देण्यासाठी प्रत्येकी रु.३.०० लाख याप्रमाणे एकूण रु.१८.०० लाख इतक्या निधीची मागणी शासनाकडे केली आहे. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना सदर निधी देण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे–

शासन निर्णय :- दि. २६/११/२००८ रोजी मुंबई शहरात झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील खालील ६ मृत व्यक्तींच्या वारसांना केंद्र शासनाच्या योजनेनुसार प्रत्येकी रु. ३ लाख याप्रमाणे एकूण रु.१८.०० लाख इतकी मदत देण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना रु.१८ लाख (अक्षरी रुपये अठरा लाख) इतका निधी पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	मृत व्यक्तीचे नांव	वारसदाराचे नांव व पत्ता
१	उमा विनोद गर्ग	श्री विनोद गर्ग (पती), १९०१, रामेश्वरम सोसायटी, किर्ती कॉलेजजवळ, धुरू रोड, दादर, मुंबई-२८.
२	विजयराव आनंथा बांजा	कु. रोहन बांजा (मुलगा), १, रतन मेनॉर गार्डन रोड, कुलाबा, मुंबई-३९.
३	निती करंबिरसिंग कांग	श्री करमबिरसिंग कांग, रूम न. ६४२/६४३, द ताजमहल पॅलेस अँड टॉवर, अपोलो बंदर, मुंबई- १
४	समरबिरसिंग करमबिरसिंग कांग	
५	उदयसिंग करमबिरसिंग कांग	
६	मैबज बिमोलचंद्र सिंग	श्रीमती मैबम ओंग्बी सनाहनबी देवी (आई), खुदाई निनगथोबुग लेकाई, पोस्ट पोरमार, इम्फाला, मणिपूर.

२. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना खालील लेखाशीर्षांतर्गत रु. १८ लाख (अक्षरी रुपये अठरा लाख फक्त) इतका निधी सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामध्ये अर्थसंकल्पीय तरतुदी अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीमधून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

मागणी क्रमांक सी-५,
२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ,
६०, इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम ,
२०० इतर कार्यक्रम ,
(०१) दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तींना सहाय्य,
(०१)(०१) दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तींना सहाय्य,
(२२३५०३४७),
३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) (दत्तमत)

३. सदर निधी अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) वर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. सदर निधीचे वितरण केंद्र शासनाच्या सूचनांनुसार संबंधित बाधितांच्या वारसांना करण्यात यावा. सदर निधीचे वितरण तातडीने करण्यात येऊन करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती सचिव, मदत व पुनर्वसन यांचेकडे सादर करावी.

४. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दि. २९ जून, २०१२ च्या पत्रामध्ये देण्यात आलेल्या सूचनेनुसार बाधित व्यक्तींच्या वारसांना मदत देण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच केंद्र शासनाकडून सदर रकमेची प्रतिपूर्ती करण्याबाबत केंद्र शासनाच्या संदर्भाधीन पत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही

जिल्हाधिकारी यांनी तात्काळ करावी व सदर पत्रासोबत जोडलेल्या Annexure-IV मधील माहिती शासनास तात्काळ सादर करण्यात यावी.

५. सदर निधीच्या वाटपाचे लेखे , अभिलेखे / नोंदवह्या विहीत कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरीत व वितरीत करणा-या कार्यालयाच्या स्तरावर अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात याव्यात. वर्ष अखेरीस संपूर्णपणे प्रमाणित विनियोजन लेखे या विभागाकडे सादर करण्याची दक्षताही नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१६०११२१६१८४११४१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ashok Rajaram Jagtap

Digitally signed by Ashok Rajaram Jagtap
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ashok Rajaram Jagtap
Date: 2016.01.12 16:22:12 +05'30'

(अ.रा.जगताप)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२) जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई.
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर
५) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर
६) वित्त विभाग (अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-४/अर्थसंकल्प-६/व्यय-९),मंत्रालय,मुंबई
७) कक्ष अधिकारी, ब-१/पीएसी/पीएसी-१ कार्यासने/म-११, म.व व.वि., मंत्रालय, मुंबई-३२
८) निवडनस्ती (म-३ कार्यासन) महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
९) पोलीस आयुक्त, मुंबई शहर, मुंबई.

<u>प्रत माहितीसाठी</u>

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,
२) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,
३) सचिव (म.व पु.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
४) संचालक व सचिव (आपत्ती व्यवस्थापन प्रभाग), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक

****